पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८.
**सामान्य प्रशासन विभाग.**
क्र. साप्रवि/तप/१७अ/कावि/६६७/२०२४.
दिनांक :-२२/१०/२०२४.

**विषय :- महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांनी भेट वस्तू (Gifts) न स्विकारणेबाबत...**

**परिपत्रक**

प्रभावी आणि लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करणे हे प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांचे कर्तव्य आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम,१९७९ मधील कलम १२ नुसार कोणत्याही शासकीय कर्मचा-याने कोणतीही देणगी (भेट वस्तू) स्वत: स्विकारता कामा नये किंवा त्याच्या कोणत्याही कुटुंबियाला किंवा त्याच्या वतीने काम करणा-या व्यक्तीला देणगी (भेट वस्तू) स्विकारण्यास परवानगी देता कामा नये तसेच सदर कलमातील टिप--२ नुसार शासकीय कर्मचा-याने त्यांच्याशी कार्यालयीन व्यवहार असणा-या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा औद्योगिक किंवा वाणिज्यिक संस्थांकडून, संघटनांकडून किंवा तत्सम मंडळाकडून मुक्तहस्ताने केलेला पाहुणचार किंवा वारंवार केला जाणारा पाहुणचार स्विकारण्याचे टाळावे असे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत.

तरी या परिपत्रकाद्वारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना कळविणेत येते की, नागरीक, ठेकेदार अथवा अन्य कोणत्याही व्यक्ती/ संस्थांकडून भेटवस्तू (Gifts) देणग्या स्विकारु नयेत किंवा त्याच्या कोणत्याही कुटुंबियाला किंवा त्याच्या वतीने काम करणा-या व्यक्तीला देणगी (भेट वस्तू) स्विकारण्यास परवानगी देवु नये. या संदर्भात **सुरक्षा विभागाने अशा भेट वस्तू घेवून येणा-यास कार्यालयात मज्जाव करावा. अशा प्रकारच्या देणग्या (भेट वस्तू) मनपाचे अधिकारी / कर्मचारी यांनी स्विकारलेचे आढळून आल्यास संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कडक कारवाई केली जाईल, याची सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी स्पष्ट नोंद घ्यावी.**

(शेखर सिंह)
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

प्रति :-

**१. सर्व विभाग प्रमुख / शाखा प्रमुख.**
सदरचे परिपत्रक आपले नियंत्रणाखालील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे.

**२.सुरक्षा विभाग.**
मनपाचे मुख्य प्रशासकीय इमारत तसेच क्षेत्रिय कार्यालय व इतर ठिकाणाच्या कार्यालयात कार्यालयाच्या आवारात अशा देणग्या (भेट वस्तू) प्रवेशद्वारातुन आत नेण्यास मज्जाव करावा.